सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ५६ ठ. क्र. 909 दि. 31/3/18 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ९६ अन्वये मान्यतेस्तव सोलापूर महानगरपालिकेचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती कडे सादर करणेत आले होते. तथापि मा. स्थायी समिती सभापती निवडीचा विषय मे. उच्च न्यायालयामध्ये/मे. सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ आहे. सदरचा विषय या परिस्थितीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम **३५ अ** प्रमाणे सोलापूर महानगरपालिकेचे सन २०१७-१८ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक **अ** व **क** सूचना शिफारसीसह उक्त अधिनियमातील कलम १०० अन्वये मा.महानगरपालिकेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दिनांक २६-३-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सन २०१७-१८ चे सुधारित अंदाजपत्रक मंजूर करणेत येत आहे.तसेच सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे फेरबदल करुन प्रस्तुत बदलासह सुचना शिफारशीसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०० अन्वये अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

**महसुली जमा बाजू**

| पान नं. | अ.क्र | जमा विवरण | मा.आयुक्त यांनी सुचविलेला अंदाज | मा.म.न.पा.ने केलेला बदल | | मा.म.न.पा.ने केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १४ | १ | **सर्वसाधारण कर, अप्रत्यक्ष कर व इतर जमा** | | | | |
| | क | सर्वसाधारण कर | ३०,००,००,००० | २,५०,००,००० | ---- | ३२,५०,००,००० |
| | ख | स्थानिक संस्था कर | ३०,००,००,००० | ५,००,००,००० | ---- | ३५,००,००,००० |
| | घ | शासन अनुदान/मुद्रांक शुल्क अनुदान | २२३,२०,००,००० | ५,००,००,००० | ---- | २२८,२०,००,००० |
| | झ | मिळकतीचे सर्व्हे करुन उत्पन्न वाढविणे | ---- | ९,००,००,००० | ---- | ९,००,००,००० |
| १६ | २ | **हद्दवाढ विभाग** | | | | |
| | १ | सर्वसाधारण कर | २४,००,००,००० | ३,००,००,००० | ---- | २७,००,००,००० |
| | ३ | इतर कर | ५,००,००,००० | ५०,००,००० | ---- | ५,५०,००,००० |
| | ६ | सफाई पट्टी | ४,५०,००,००० | ५०,००,००० | ---- | ५,००,००,००० |
| | ८ | मिळकतीचे सर्व्हे करुन मिळणारे उत्पन्न | ---- | १५,००,००,००० | ---- | १५,००,००,००० |
| १८ | ७ क | **पथ व इमारती** | | | | |
| | ६ | खाजगी लेआऊट रस्ते ड्रेनेज सुपरव्हीजन चार्जेस | ३,००,००,००० | २,००,००,००० | ---- | ५,००,००,००० |
| | १३ | खाजगी लेआऊट ड्रेनेज लाईन टाकणेपोटी जमा | १,००,००,००० | १,००,००,००० | ---- | २,००,००,००० |
| | १६ | विकास शुल्क | २०,००,००,००० | ५,००,००,००० | ---- | २५,००,००,००० |
| | १७ | गुंठेवारी क्षेत्रात मुलभूत सोयी करणे | ५,००,००,००० | ५,००,००,००० | ---- | १०,००,००,००० |
| १९ | ८ | **भवने व भूमी यांची व्यवस्था** | | | | |
| | १ | उक्ते जागा इमारत भाडे | ७,००,००,००० | १७,००,००,००० | ---- | २४,००,००,००० |
| | २ | किरकोळ खुली जागा भाडे | ७५,००,००० | ५,००,००,००० | | ५,७५,००,००० |
| | ४ | अधिकृत व अनाधिकृत जागा वापराचे भाडे | ३०,००,००० | १,००,००,००० | ---- | १,३०,००,००० |
| नविन सदर | ९ | स्टेडियम कमिटी गाळे भाडे | ---- | ४,००,००,००० | ---- | ४,००,००,००० |

उपरोक्त बदलामुळे एकूण बेरजेत खालील प्रमाणे बदल करण्यांत येत आहे.

पृष्ठ क्र.२३ वरील १ ते १४ ची बेरीज र.रुपये ५०८,४१,७९,०००/- ऐवजी र.रुपये ५८८,९१,७९,०००/- इतकी येते.शिलकेसह एकूण र.रुपये ५८८,९४,३६,४०१/- इतकी येते.

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~सन्मा~~/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ९८८ ठ. क्र. 202
दि. 12/6/18 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ सालाचे जमा व खर्चाचे अंदाजपत्रक **ब** सूचना, शिफारस व उपाय योजनेसह यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ९८ (१) (२) अन्वये मा. परिवहन समिती व ९८ (३) अन्वये मा. स्थायी समितीची शिफारसीसह मान्यता मिळणे आवश्यक होते तथापी सध्या मा. स्थायी समिती संदर्भात मे. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ बाब असलेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३५ अ प्रमाणे सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१७-१८ सालाचे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१८-१९ सालाचे अंदाजपत्रक **ब** सूचना शिफारसीसह उक्त अधिनियमातील कलम १०० अन्वये मा.महानगरपालिकेची मान्यता मिळणेस्तव मा. परिवहन समिती ठराव क्र. ६६, दिनांक २७-३-१८ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा. परिवहन समितीने सूचविलेल्या सन २०१७-१८ चे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे. परिवहन उपक्रमाचे सन २०१८-१९ चे मा. परिवहन समितीने शिफारस केलेले **अंदाजपत्रक-ब** मध्ये पुढीलप्रमाणे दुरूस्त करून सूचना व शिफारसीसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०० अन्वये मान्यता देणेत येत आहे.

**<u>जमा बाजू-</u>**

| अ. क्र. | तपशील | मा.परिवहन समितीहने सुचविलेला अंदाज | या फेर-फारामुळे झालेला फरक | | मा. म.न.पा. ने केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | कमी | |
| १ अ | बस भाडे | १७,५०,००,००० | ---- | ---- | १७,५०,००,००० |
| ३ अ | सो.म.पा. हद्दीतील इ. १ ली ते १० वी शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत बसप्रवास करीता मनपा अनुदान | २,२५,००,००० | ---- | ---- | २,२५,००,००० |
| ३ क | रिझर्व्ह बसेस (कंत्राटी पासेस) | ११,००,००० | ---- | ---- | ११,००,००० |
| ५ | निरूपयोगी माल विक्री | ३,००,००० | ---- | ---- | ३,००,००० |
| १४ | मा.म.न.पा.कडून अनुदान | ३७,९६,००,६०६ | ---- | २६,९६,००,६०६ | ११,००,००,००० |
| १५ | परिवहन कडील सात रस्ता सब डेपो बी.ओ.टी.तत्वावर विकसीत करणे | ---- | २६,९६,००,६०६ | ---- | २६,९६,००,६०६ |
| | | **एकूण** | २६,९६,००,६०६ | २६,९६,००,६०६ | |

| | | |
|---|---|---|
| एकूण जमेत वाढ | रक्कम रू. | २६,९६,००,६०६/- |
| एकूण जमेत कपात | रक्कम रू. | २६,९६,००,६०६/- |
| एकूण जमेत वाढ | रक्कम रू. | ----------- |
| मा. परिवहन समिती यांनी सूचविलेली एकूण जमा | रक्कम रू. | ८०,४२,५१,६०६/- |
| मा. म.न.पा.ने सूचविलेली जमेत वाढ | रक्कम रू. | ----------- |
| मा. म.न.पा.ने सूचविलेली एकूण जमा | रक्कम रू. | ८०,४२,५१,६०६/- |

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ५८ ठ. क्र. 903
दि. 12/6/18 रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्राथमिक शिक्षण मंडळाचे सन २०१८-१९ सालाचे प्राथमिक शिक्षणाचे व बिगर प्राथमिक शिक्षण खात्याचे प्रशासन अधिकारी यांनी तयार केलेले अंदाजपत्रकात आवश्यक दुरुस्ती व तरतुदी सुचविण्यात आलेल्या आहेत. सबब प्राथमिक शिक्षण मंडळाचे सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकास मा.म.न.पा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा.आयुक्त यांचे दिनांक २७-३-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्राथमिक शिक्षण मंडळाचे सन २०१८-१९ चे बिगर प्राथमिक शिक्षणाचे अंदाजपत्रकात पुढील फेर फार करून सूचना शिफारशीसह मान्यता देण्यात येत आहे.

## महानगरपालिका बिगर प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर

| अ.नं. | तपशिल | मा.आयुक्त यांचा अंदाज | मा.मनपाने केलेले फेर बदल | | मा.मनपाने मान्य केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | कमी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ५ | क्रिडा महोत्सव | १,००,००० | ३,००,००० | ---- | ४,००,००० |
| १२ | बालवाडी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना गणवेष (प्रत्येकी दोन गणवेष) | ५,००,००० | २,००,००० | ---- | ७,००,००० |
| १३ | स्कूल बॅग/ वॉटर बॅग/शुज/ | ---- | ५,००,००० | ---- | ५,००,००० |
| २९ | राष्ट्रीय विज्ञान व विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करणे | ---- | ५०,००० | ---- | ५०,००० |
| ५० | स्मार्ट स्कूल | ---- | १,००,००,००० | ---- | १,००,००,००० |
| ५५ | जुने रेकॉर्ड संगणकीकरण करणे (शाळा सोडलेले दाखले, जनरल रजिष्टर, इतर रजिष्टर, कागदपत्रे, सेवापुस्तके इत्यादी) | २,००,००० | २,००,००० | ---- | ४,००,००० |
| | बिगर प्राथमिक अंदाजपत्रकातील अ.क्र. १ ते ५५ बाबीसाठी कमी पडणारी रक्कम | ---- | ८७,५०,००० | ---- | ८७,५०,००० |

उपरोक्त बदलामुळे एकूण बिगर प्राथमिक अंदाजपत्रकाची बेरीज र.रू.२,००,००,०००/- ऐवजी र.रू. ४,००,००,०००/- इतकी येते.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.स...५६..ठ. क्र......९०४
दि.२८/६/९८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सौ. योगिता वसंत जोशी वय वर्षे ३४ राहणार ४२ सवेरा नगर सैफुल विजापूर रोड सोलापूर. यांचे पती श्री वसंत गोपाळराव जोशी वय वर्षे ३४ हे लिवर सोरायसिस या आजाराच्या शेवटच्या घटकेला आहेत. त्यांचा उपचार ज्युपीटर लाईफ लाईप पुणे येथे चालू आहे. डॉक्टरांनी त्यांना लिवर ट्रान्सप्लांटेश करण्यास सांगितले आहे. सदर ऑपरेशनचा खर्च २३लाख रुपये पर्यंत येईल असे डॉक्टरांनी सांगितले आहे. परंतु आमच्याकडे कोणीही नोकरीस नसुन खाजगी नोकरी करीत असल्याने आमची आर्थिक परस्थिती गरीबीची हालाकीची आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत मिळणेस मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

(signature)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज ई.ए.ठ. क्र....१०५
दि....१२/६/१८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील सोलापूर शहरातील जुना प्रभाग क्र. २ सध्याचा नविन प्रभाग क्र. १ मधील धोत्रीकर वस्ती भवानी पेठ सोलापूर येथील सार्वजनिक चौक गेल्या २० ते २५ वर्षापासून अस्तित्वात आहे. तेथील रहिवाश्यांची मागणी पाहता या चौकास लोकमाता चौक असे नामकरण करणे आणि सदर चौकास लोकमाता चौक असे नामकरण करुन त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने **लोकमाता चौक** असे नामफलक बसविणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सानुको/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ ६१ ठ. क्र. २०६
दि. २/६/१८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

आकाशवाणी केंद्र चौक, करली चौक, शरणमठ चौक, ताई चौक, मार्कंडेय चौक या नावाने ओळखले जाणा-या भागात मोठया प्रमाणात लोकवस्ती असून या सर्व चौकांना वरील प्रमाणे नामकरण करणेस व सदरचे चौकास नामफलक हे ग्रेनाईटचे तयार करणेस व ते ज्या ज्या चौकास लावणेस आणि या कामी येणा-या खर्चास मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. 62 ठ. क्र. 906 दि. 12/6/18 रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



शहर सोलापूर, हद्दवाढ बाळे, स.नं.२८/२ या जागेवरील मंजूर विकास योजनेनुसार असलेले आरक्षण क्र.११/७८स्मशानभुमी व दफन भुमी याकरिता चे क्षेत्र २२०००.०० चौ.मी. या जागेबाबत संबंधित मिळकतदार श्री. किशोर रंगनाथ पाटील व इतर १) यांनी महा. प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दिलेल्या नोटीसीस अनुसरुन अर्ज केलेले आहे. व मा. शासनाचे नगरविकास विभागाचे दि. २८-०१-२०१६ ची अधिसूचना क्र.टी.पी.एस. १८१३/३०६७/प्र.क्र.१२२/१२/म.न.पा./नवि-१३ या नुसार, आ.क्र. ११/७८ ही आरक्षणाची जागा मनपाने भूसंपादन करणेच्या अनुषंगाने मिळणारा मोबदला T.D.R.स्वरुपामध्ये घेण्यास अर्जदाराने नकार दिलेला आहे. त्यानुसार मा. शासनाचे भूसंपादनाचे आदेशा प्रमाणे वेळोवेळी सुधारीत होणा-या कायदयानुसार भूसंपादन कार्यवाही करणेबाबत मान्य असल्याचे पत्र दिलेले आहे. अर्जदाराने त्याचे जागेतील मंजूर विकास योजनेनुसार प्रस्तावित आरक्षणाच्या जागेचे मनपाकडून होणा-या भूसंपादनाची कार्यवाहीच्या अनुषंगाने रोख रकमेच्या स्वरुपात मोबदला मिळणेबाबत मागणी केलेला आहे. त्यानुसार मा. शासनाचे सन २०१७/१८ चे शिघ्रसिध्दगणकानुसार सदर आरक्षणाच्या जागेचे मुल्यांकन रक्कम रु. २,४४,२०,०००/- (अक्षरी दोन कोटी चव्वेचाळीस लाख वीस हजार फक्त) याप्रमाणे मिळकतधारकांना मोबदला देणेकामी, बजेट तरतूद होऊन मिळणेबाबत मा.म.न.पा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचेकडेस सादर केलेल्या जा.क्र.ससंनर/नर/१८/४९४३, दि. ०३/०३/२०१६ चे प्रस्तावास माननियांनी दि. ०६/०३/२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी मा. आयुक्त यांनी सदर प्रकरणी दिलेल्या मान्यतेनुसार, संपूर्ण प्रकरण मा.म.न.पा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा.आयुक्त यांचे दि.०६-०३-२०१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्रस्तावात नमूद केलेल्या संबंधिताची जागा संपादन करुन मोबदला देणेकामी सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती आहे किंवा नाही या संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. ६...३.ठ. क्र......१०८ दि. १२।६।१८ ....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



शहर हद्दवाढ मजरेवाडी, सोलापूर मंजूर विकास योजनेनुसार जुना सर्व्हे नं. ३१४/अ/१, नविन सर्व्हे नं. १३६/अ१/२ चे एकूण क्षेत्र ६.०० हेक्टर ६८.४३ आर पैकी आरक्षण क्र. ६/४२ प्रायमरी स्कूल अॅन्ड प्ले ग्राउंड चे क्षेत्र ३६.०० आर संपादीत करणेबाबत अर्जदार मंगल बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्सचे भागीदार १) श्री. वेणूगोपाळ बद्रीनारायण तापडीया व इतर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दि. ९-५-२०१६ रोजी नोटीस दिलेले आहे. तसेच मा. शासनाचे नगर विकास विभागाचे दि. २८-०१-२०१६ ची अधिसूचना क्र. टी.पी.एस. १८१३ /३०६७/प्र.क्र.१२२/१२/म.न.पा./नवि-१३ अन्वये अर्जदार मंगल बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्सचे भागीदार १) श्री. वेणूगोपाळ बद्रीनारायण तापडीया व इतर यांनी दि. २-३-२०१७ रोजी भूसंपादन कार्यवाहीचा मोबदला TDR स्वरुपात घेण्यास नकार दिलेला आहे. तसेच मा. शासनाचे भूसंपादन आदेशानुसार वेळोवेळी सुधारीत कायद्यानुसार भूसंपादनाची कार्यवाही होण्यास हरकत नाही असे पत्र दिलेले आहे. त्यानुसार विषयांकित जागेतील आरक्षणाची जागा व्यपगत होऊ नये याकरिता सदर जागेचे भूसंपादन करणेकरिता सन २०१७-१८ च्या शासनाचे शिघ्रसिध्दगणकानुसार अंदाजे रक्कम रुपये २,६७,१२,०००/- (अक्षरी दोन कोटी सदुसष्ट लाख बारा हजार) इतकी रक्कम आवश्यक आहे. प्रत्यक्ष भूसंपादनाच्या वेळेस होऊ शकणारा फरक विचारात घेऊन रक्कम रुपये २,६८,००,०००/- (अक्षरी दोन कोटी अडुसष्ट लाख फक्त) इतकी रक्कम विषयांकित जागेतील आरक्षणाची जागा संपादित करणेच्या अनुषंगाने मोबदला देणेकामी तरतूद उपलब्ध होणेस्तव प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १६-३-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्रस्तावात नमूद केलेल्या संबंधिताची जागा संपादन करुन मोबदला देणेकामी सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती आहे किंवा नाही या संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा. ६४ ठ. क्र. २०९
दि. १२/६/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

६४

ज्याप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेतील कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय उपचार घ्यावे लागल्यास त्याचा खर्च महानगरपालिकेकडून दिला जातो. त्याच प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर सोलापूर महानगरपालिकेच्या आजी-माजी सदस्यांना व त्यांच्या कुटूंबियाना (आई-वडील, पती /पत्नी, मुलगा-मुलगी इत्यादी ) काही कारणासाठी ॲडमीट व्हावे लागल्यास त्याचा खर्च महानगरपालिकेने अदा करावा. अथवा सर्व सदस्य व कर्मचाऱ्यांच्या नांवे आरोग्य विमा उतरवून त्याचा प्रिमियम महानगरपालिकेने भरावा. जेणेकरुन एखाद्या सदस्याचे आरोग्य अचानक ढासळले किंवा काही अपघात झाला तर त्याच्यावर आर्थिक संकट कोसळणार नाही. तरी महानगरपालिकेच्या आजी-माजी सदस्यांना व त्यांच्या कुटुंबियांना (आई-वडील, पती /पत्नी, मुलगा-मुलगी इत्यादी ) वैद्यकीय उपचाराकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.६५..ठ. क्र......११०
दि.१२/६/९८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. १२ क मधील रहिवाशी श्री. विजय नरसप्पा बिजगिरी, राहणार प्लॉट नं. २३ माळी नगर, एमआयडीसी, सोलापूर हयांचे नांवे असलेला प्लॉट नं. २३ माळी नगर, येथे राहणारे घर हे वादळी वा-यामुळे घर व त्याची भिंत, पत्रे हवेत उडून गेली आहेत. अत्यंत हालाकीची परिस्थिती आहे. त्यांना तीन मुली व पत्नी असा त्यांचा परिवार आहे. वरील घटनेमुळे त्यांचे कौटूंबिक जीवन उध्वस्त झालेले आहे. बाहेरील ओळखीपाळखीच्या लोकांकडून हात उसने घेऊन काही मोजक्या वस्तू घेऊन सध्या ते आपला चरितार्थ चालवित आहेत. तेव्हा वरीलप्रमाणे परिस्थिती पाहता श्री. विजय नरसप्पा बिजगिरी यांना त्यांचे वरील प्रमाणे झालेले नैसर्गीक नुकसान भरपाई म्हणून वा एखादे गरीब कुटूंबाची नाहक हानी झाल्याने त्यांना मदत म्हणून महापालिकेकडून जास्तीत आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. तात-१/६६ ठ. क्र. १११
दि. १२/६/१८ रोजी ठेवला त्यावरील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-१/६६

स्वस्तीक प्रिती फिल्म प्रॉडक्शन आणि अमरचित्रवाणी निर्मित म्होरक्या या चित्रपटाला ६५ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारामध्ये उत्कृष्ठ बाल चित्रपट सुवर्णकमळ व रमण देवकर यास विशेष उल्लेखनीय कामगिरी पुरस्कार देऊन गौरविण्यांत आलेला आहे. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव कलकत्ता आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये देखील म्होरक्या चित्रपट प्रदर्शनापूर्वीच अव्वल ठरला आहे. उल्लेखनीय बाब अशी की म्होरक्या चित्रपटाचे निर्माते कै. कल्याण पडाल, युवराज सरवदे लेखक दिग्दर्शक सहनिर्माते अमर भारत देवकर आणि सर्व कलावंत/तंत्रज्ञ हे सर्व सोलापूर शहर जिल्हयातील असून चित्रपटाचे चित्रीकरण देखील सोलापूर जिल्हा आणि परिसरात झाले आहे. त्यांची पहिली निर्मिती असलेला म्होरक्या या चित्रपटाची राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठया प्रमाणात दखल घेण्यात आलेली आहे ही सोलापूर जिल्हयाच्या दृष्टीने अत्यंत मोठी आणि कौतुकास्पद बाब आहे. यामुळे सोलापूरचा लौकीक राष्ट्रीय पातळीवर पुन्हा एकदा वाढत आहे तरी म्होरक्या या चित्रपटाच्या कलावंताना सोलापूर महानगरपालिकेकडून मानपत्र देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यास तसेच याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुक्तो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ता त-२/५७ ठ. क्र. ....११२
दि.२०/६/१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-२/६७

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार आदरणीय श्री. विजयसिंहजी (दादा) मोहिते-पाटील यांना मानपत्र देवून गौरव करणेबाबत

सोलापूर शहर जिल्हयाच्या राजकीय, सामाजिक व सार्वजनिक जिवनात गेल्या ६० ते ७० वर्षापासून अकलूज येथील मोहिते-पाटील घराण्याचे योगदान आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा खासदार आदरणीय श्री. विजयसिंहजी (दादा) मोहिते-पाटील हे १२ जून रोजी वयाची ७५ वर्ष पूर्ण करीत आहेत. ग्रामीण भागातून सरपंच पदापासून ते जि.प.अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री पदापर्यंतची वाटचाल ही नेहमीच प्रेरणादायी ठरलेली आहे. सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्री असतांना विजयदादांनी सोलापूर शहराच्या विकासाचे अनेक निर्णय घेतले आहे. सोलापूर शहरातील कायदा सुव्यवस्था व शांतता अबाधित राहण्याकरिता कठीण प्रसंगी योग्य पावले उचलले म्हणून सोलापूर शहरात अप्रिय घटना घडलेले नाहीत. कंबर तलाव जवळ विजापूर रोड येथे पर्यटन विकासाच्या माध्यमातून दादांनी केटरींग कॉलेजची निर्मिती केली. नविन विश्राम गृह बांधले व नविन जिल्हाधिकारी कार्यालय व पासपोर्ट ऑफिससाठी प्रयत्न केले. बांधकाममंत्री/पर्यटन मंत्री/उपमुख्यमंत्री असतांना दादानी सोलापूर विद्यापीठ निर्मितीसाठी प्रयत्न करुन तत्कालीन मुख्यमंत्री शिंदे साहेब असतांना दोघांच्या प्रयत्नाने विद्यापीठ मंजूरी मिळाले. शहराच्या विकास योजनेच्या प्रकरणांना मंजूरी दिली. सोलापूर शहरातील एकात्मिक रस्ते विकास योजनेची मंजूरी त्यांनी दिली. तसेच विकासाभिमुख कामे केलेली आहेत. सोलापूर शहरातील अनेक संस्था, चादर व टॉवेल कारखाने, लघुउद्योग, विडी उद्योग, सहकारी व नागरी बँका, सहकारी रुग्णालये तसेच सोलापूर महानगरपालिकेचे वेगवेगळे प्रश्न शासन दरबारी मार्गी लावून सोलापूर शहर व जिल्हयाच्या विकासास मोठा हातभार लावलेला आहे. सन २००२ ते २००४ या वर्षात सोलापूर शहरात पाण्याची भिषण टंचाई निर्माण झाल्यावर त्याकाळात दादांनी वेळोवेळी सोलापूर पाणी प्रश्नासंदर्भात हिताचे निर्णय घेतले व शासनास घेण्यास भाग पाडले हे सर्वांना व आपणांस माहितीच आहे. धार्मिक स्थळ व तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत ग्रामदैवत श्री. सिध्देश्वर मंदिर अक्कलकोट-कुडलसंगम-येथील तीर्थक्षेत्र व सोलापूर शहरातील व जिल्हयातील धार्मिक स्थळांच्या विकासासाठी विशेष निधी मंजूर केला. जिल्हयातील डाळींब उत्पान शेतक-यांच्या अडचणी सोडविणे करिता राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र होणेकरिता मा. पवारसाहेब यांच्याकडे पाठपुरावा केला. सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने खासदार आदरणीय श्री. विजयसिंह दादा मोहिते-पाटील यांना मानपत्र देवून त्यांच्या सार्वजनिक जिवनातील ४५-५० वर्षाच्या कार्याचा गौरव व्हांवा. विजयदादांनी २९ वर्षे आमदार व गेले ४ वर्षापासून खासदार म्हणून कार्यरत आहे. त्यांच्या योगदानाबद्दल आपण सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने विजयदादांना मानपत्र देवून यथोचित सन्मान करण्यास व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-३/६८ ठ. क्र. ...११२
दि. १२/६/१८ ....रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव
एकमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-३/६८

मा. नानासाहेब धर्माधिकारी यांनी सोलापूर शहराच्या स्वच्छतामध्ये सहभाग घेवून ५० टनाच्या वर कचरा उचलून शहर स्वच्छ ठेवण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे नानासाहेब धर्माधिकारी यांना मानपत्र देणेस्तव आलेल्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.